# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/११/२०१६

**१) जादुटोनाच्या कारणावरुन कु–हाडीने मारुन गंभिर जखमी केले व जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केला . :–**

दिनांक १७/११/२०१६ रोजी ०४.०० वा दर. यातील फिर्यादी शिवशंकर सहादेव सेलोकर वय ६० वर्ष, रा. मांढळ व आरोपी सख्ये भाऊ असुन एकमेकांचे शेजारी राहतात. यातील आरोपीने फिर्यादी हा जादुटोना करतो वैद आहे ज्योत बारवतो व मतंर म्हनतो त्यामुळे आरोपीच्या म्हशी दुध कमी देतात अशा संशयावरुन आरोपीने फिर्यादीचे घरात प्रवेश करुन जिवे ठार मारण्याचे उद्येशाने कु–हाड घेवुन फिर्यादी व त्याची पत्नी सौ. लक्ष्मी वय ५० वर्ष हे झोपेत असतांना त्यांचेवर कु–हाडीने डोक्यावर, मानेवर, खांदयावर मारुन गंभीर जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी व जखमीचे बयान व वैद्यकीय अहवाला वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५०,३०७ भादंवि. सहकलम ३(१)(३)महाराष्ट्र जादुटोना कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. परदेशी पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) बांधकामाचे बिल काढले नाही याकारणावरुन शिविगाळ केली व शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/११/२०१६ रोजी १६.०० वा. यातील फिर्यादी उत्तम शंकर सावंत वय ३६ वर्ष, उपसंचालक रा. नवेगाव/नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदीया हा वन विभाग उपसंचालक या पदावर कार्यरत असुन अपिल कार्यालयात लोकसेवक म्हणुन शासकीय काम करीत असतांनी यातील आरोपीने कार्यालयात जाऊन केलेल्या बांधकामाचे बिल काढले नाही या कारणावरुन जोराजोरात बोलुन फिर्यादीस शिविगाळ करुन टेबलाकडे येवुन धमकी दिली व शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५३,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. गांवडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) बिएसएनएल कार्यालयातुन बॅटरीची चोरी. ;–**

दिनांक १६/११/२०१६ चे तिन महीण्यापुर्वी पासुन यातील बिएसएनएल कार्यालय साकोली येथील कंडम बॅटरी सेल हे दोन वर्षा पासुन ऑफीसच्या खुल्या जागेत ८३७ नग साठवुन ठेवले असता फिर्यादीने तिन महीण्यापुर्वी पाहणी केली असता ८३७ पैकी ३६२ नग (एनईडी ईनजी, अमर राजा, एचगीएल इनआयएफई पावर सिस्टीम, एझीट बॅटरी) कंपनीच्या एकुण किंमती अंदाजे २७,५६००/–रु. चा माल चोरीस गेल्याचे आढळुन आल्याने फिर्यादीने सहाही संशयीत आरोपीतांवर संशय व्यक्त केल्याने फिर्यादी शैलेंद्र पंढरी शेंडे वय ४२ वर्ष, रा. प्लॉट क्र. २९ मानेवाडा नागपुर ह. मु. श्रीनगर कॉलोनी सेंदुरवाफा उपविभागीय अधिकारी बि. एस. एन. कार्या साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १७/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. साकोली व गोबरवाही येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०७ लिटर हातभट्टी दारु कि. ७००/–रू. तसेच जुगारातुन कि. ५,९५०/–रु. असा एकुण कि. ६,६८०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.